महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

# कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

'सिंचन भवन', ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे कार्यालय
Email:- eemdkop@gmail.com Web:- https://wrd.maharashtra.gov.in ☎:- 0231-651284

जा.क्र. यांविको/ लेशा-१/२४८९ सन२०२५

दिनांक:-१४/११/२०२५

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
कोल्हापूर.

**विषय** :- **निविदा सुचना क्र. 08 सन 2025-2026 प्रसिध्द करणेबाबत**
**संदर्भ** :- 1) शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. निविदा 0417/(प्र.क्र. 247/17)/मोप्र-1, दि. 18/10/2023.
2) शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. मावज-2018/प्र.क्र348/34, दि. 20/12/2018.

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून सस्नेह सादर करणेत येते की, शासनाच्या जलसंपदा विभागातंर्गत या विभागामार्फत धरण, कालवे यांच्या नैमित्तिक देखभाल आणि दुरूस्तीची कामे केली जातात. यासाठी आवश्यक असणाया शासनाच्या मालकीच्या मातीकामाच्या अवजड व हलक्या यंत्रसामग्री या विभागाकडे कार्यरत आहेत. सदर यंत्रसामग्रीच्या परिचलनासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ शासन धोरणानुसार निविदेव्दारे बाह्य अभिकरणांकडून घेण्यात येते. सदरच्या सर्व यंत्रसामग्री सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील धरण व कालवे यांच्या नैमित्तिक देखभाल आणि दुरूस्तीसाठी वापरण्यात येतात. शासनाच्या मालकीची धरणे व कालवे यांच्या देखभालीसाठी शासनाच्या मालकीची यंत्रसामग्री कार्यरत राहणे आवश्यक आहे. संदर्भिय पत्रांन्वये आपले कार्यालयास प्रसिध्दीसाठी दिलेल्या निविदा सूचनांमधे शासनाच्या मालकीच्या यंत्रसामग्रीच्या परिचलनासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ सेवा पुरवठा या कामांचा समावेश आहे. सदरची जाहिरात वर्तमानात प्रसिध्द केलेमुळे आदर्श आचार संहितेचा कोणताही भंग हाणोर नाही, असे या कार्यालयाचे मत आहे. किंवा झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहील. (संदर्भ- स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूका २०२५ आदर्श आचार संहिता एकत्रित आदेश दिनांक ०४.११.२०२५ मुद्दा क्र.१८ पृष्ठ क्र.१२/४४). **सबब** या कार्यालयाची ई-निविदा सुचना क्र. 08 सन 2024-2025 ही या पत्रासोबत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करणेसाठी पाठविणेत येत आहे. कृपया ती कोल्हापूर जिल्हा पातळीवर लघु संवर्गातील एका मराठी दैनिकामध्ये आणि लघु संवर्गातील एका मराठी साप्ताहिकामध्ये प्रसिध्दीस देण्यात यावी ही विनंती.

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर 416003 दुरध्वनी क्र. (0231) 2651284 |
| जाहिरात कोणत्या दिनांकास प्रसिध्द करावयाची तो दिनांक | **दि. 26/11/2025 किंवा त्यापुर्वी** |
| कामाचे नाव | यांत्रिकी उपविभाग क्र. 4 कोल्हापूर या उपविभागाकडील एस्क्सॅव्हेटर, डोझर्स, लोडर व टिप्पर्स यांच्या परिचलन व देखभाल दुरुस्तीकरीता आवश्यक हलके वाहन चालक व मदतनीस सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत |
| कामाची किमत | **रु.4,18,628/-** (रु. चार लक्ष अठरा हजार सहाशे अठ्ठावीस रुपये फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) |
| प्रसिध्दी स्वरुप | कोल्हापूर जिल्हास्तर |
| कोणत्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे? | कोल्हापूर जिल्हास्तरावरील लघु संवर्गातील एक दैनिक व लघु संवर्गातील एक साप्ताहिकामध्ये (अद्ययावत शासन निर्णयानुसार) |
| देयक पाठविण्याचे ठिकाण | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर 416003 दुरध्वनी क्र. (0231) 2651284 |

तसेच उपरोक्त कामाच्या जाहिरातीसाठीचा निधी उपलब्ध करुन देणेत येईल.

**सोबत - सुचना 3 प्रतीत.**

**(र. ज मोमीन)**
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, कोल्हापूर.**

| यांत्रिकी मंडळ कोल्हापूर. | |
|---|---|
| आ. क्रं. | ६८९४ |
| दिनांक | |
| अ. अ. | |
| उप अ.अ. | |
| स. अ. अ. | |
| अधीक्षक | |
| प्र. लि. | |

**प्रत:-** मा. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.
सोबत- सुचना. या विभागाची सोबत जोडलेली सुचना वेबसाईटवर प्रसिध्दीस देणविषयी व सुचना फलकावर लावणे विषयी विनंती.
**प्रत:-** मा. उपअभियंता यांत्रिकी उपविभाग क्र 4, कोल्हापूर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सादर.

Scanned by CamScanner

**परिशिष्ट-4**

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय

पत्ता:- सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६००३
ई-मेल:- eemdkop@gmail.com दुरध्वनी क्र. :- (०२३१) २६५१२८४

निविदा सुचना क्र. **०८** सन **२०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे खाली नमूद केलेल्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामासाठी ब-1 नमुन्यात (ऑफलाईन) निविदा मागवित आहेत. शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र. संकीर्ण/1117/ प्र.क्र.104/17/यांत्रिकी, दि.14/03/2018 अन्वये "निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही." निविदा कागदपत्रे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर येथे रु. 1,000/- (रु. एक हजार मात्र) + रु. 180/- (*रु. एकशे एशी मात्र*) (18% *वस्तू व सेवा कर*) (ना परतावा) इतकी फी रोखीने भरुन मिळतील. पोस्टाने निविदा संच हवे असल्यास अतिरीक्त रु. 100/- (*रु. शंभर मात्र*) (ना परतावा) भरावे लागतील. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| *कामाचे नाव :-* | यांत्रिकी उपविभाग क्र. 4 कोल्हापूर या उपविभागाकडील एस्क्सॅव्हेटर, डोझर्स, लोडर व टिप्पर्स यांच्या परिचलन व देखभाल दुरुस्तीकरीता आवश्यक हलके वाहन चालक व मदतनीस सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत |
| जिल्हा :- | कोल्हापूर |
| निविदेची अंदाजित किंमत रुपये :- | **रु.4,18,628/-** (रु. चार लक्ष अठरा हजार सहाशे अठ्ठावीस रुपये फक्त) (वस्तु व सेवा कर वगळून) |
| कोऱ्या निविदा संच विक्री कालावधी :- | दिनांक :- 26/11/2025 रोजी सकाळी 11.00 वा. पासुन<br>दिनांक :- 03/12/2025 रोजी सायंकाळी 17.45 वा. पर्यंत |
| भरलेल्या निविदा सादर करणेचा कालावधी :- | दिनांक :- 26/11/2025 रोजी सकाळी 11.00 *वा.* पासुन<br>दिनांक :- 05/12/2025 रोजी सायंकाळी 17.45 वा. पर्यंत |
| निविदा उघडणेचा कालावधी :- | दिनांक :- 08/12/2025 रोजी सकाळी 11.00 वा. (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

1) संकेतस्थळ :- www.mahayantriki.org and www.wrd.maharashtra.gov.in
2) निविदेमध्ये काही बदल होत असल्यास असे बदल फक्त या कार्यालयाचे सूचनाफलकावर आणि वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील (वृत्तपत्रात प्रसिध्द केले जाणार नाही.)
3) निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

(र. ज मोमीन)
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग, कोल्हापूर

जा.क्र. यांविको/लेशा-1/ २४८६ /सन 2025
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय,
दि. :- २१/११/२०२५

प्रत:- मा. अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, कोल्हापूर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सविनय सादर.
2/- वरील प्रमाणे या विभागाची सोबत जोडलेली निविदा सुचना वेबसाईटवर प्रसिध्दीस देणविषयी व सुचना फलकावर लावणे विषयी विनंती.
प्रत:- तांशा-2 (विभागीय कार्यालय) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- व.ले.ली (विभागीय कार्यालय) यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत:- नोटीस बोर्ड (विभागीय कार्यालय).
प्रत :- कार्यकारी अभियंता, प्रशासन संगणीकरण विभाग, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.
2/- कृपया सोबतची निविदा सुचना जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी ही विनंती.



Scanned by CamScanner